**ग्रामसेवक गट-क संवर्गातील कर्मचा-यांच्या**
**सर्वसाधारण बदल्या व नेमणूका करणेबाबत - २०२३**

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-१/१४२३/२६९/२०२३
अहमदनगर दिनांक ३०/०५/२०२३

**वाचा -** १. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. जिपब-४१४/प्र.क्र.-११२/आस्था-१४ दि. १५/०५/२०१४.
२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडिल शासन शुध्दीपत्रक क्रं.पत्र जिपब ४१४/प्र.क्रं.११२/आस्था १४,दि. ०२/०७/२०१४
३. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. जिपब-४८१७/प्र.क्र.-२२८/आस्था-१४ दि. ०७/०३/२०१९
४ सर्वसाधारण बदल्यांचे इतिवृत्त दि. १०/०५/२०२३

शासनाकडील संदर्भ क्र.१ च्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार संदर्भ क्र. २ व ३ अन्वयेचे शुद्धीपत्रक व तद्अनुषंगिक निर्णयातील तरतुदीनुसार जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेले खालील ग्रामसेवक गट क या संवर्गातील कर्मचा-यांच्या समुपदेशनाने त्यांच्या नावापुढे रकाना क्रमांक ३ येथून रकाना क्रमांक ४ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी **आदिवासी क्षेत्रात काम केलेने इतर तालुक्यात विनंती कारणास्तव** बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | ग्रामसेवकाचे नाव | कार्यरत ठिकाण | | बदलीचे ठिकाण | | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामपंचायत | तालुका | ग्रामपंचायत | तालुका | |
| १ | २ | ३ | | ४ | | ५ |
| १. | श्रीम विदया तुकाराम गाडेकर | पिंपरकणे | अकोले | बहिरवाडी | अकोले | विनंती कारणास्तव |
| २. | श्री सोमा मुरलीधर येडे | करंडी | अकोले | तांबोळ | अकोले | विनंती कारणास्तव |

वरील कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी हजर होणकामी दि.३१/०५/२०२३ रोजी कार्यमुक्त करणेत येत आहे. संदर्भ क्र.१ मधील प्रकरण १ मुद्दा क्र.७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन दिनांक ०१/०६/२०२३ नंतर वेतन व भत्ते अदा करु नये, अन्यथा पदग्रहण अवधी बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (Dies Non) म्हणून गणला जाईल.

तसेच बदली ही संपुर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. सदरची बदली विनंती कारणास्तव करण्यात आली असल्याने त्यांना पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रं. २०२३०५३००६०१३० असा आहे.

स्वाक्षरीत/-
(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रति.
१. श्रीम विदया तुकाराम गाडेकर,ग्रामसेवक ,पंचायत समिती अकोले
२. श्री सोमा मुरलीधर येडे,ग्रामसेवक,पंचायत समिती अकोले.
व्दारा व प्रत -गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले
२/-उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधिताचे वेतन दिनांक ०१/०६/२०२३ नंतर अदा करु नये. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले.
२/-संबंधीत ग्रामसेवक हे रुजु होताच रुजू अहवाल तात्काळ सादर करावा.
प्रतः- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर
प्रतः- निवडनस्ती
**(स्थळप्रतीवर मा मु.का.अ.यांची स्वाक्षरी असे)**

(राहुल शेळके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं)
जिल्हा परिषद, अहमदनगर

CamScanner